JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी, खिस्ती, मुस्लिम, जनवादी साहित्य चळवळीचा प्रभाव’

**डॉ. हेमंत म. देषमुख (मराठी विभाग प्रमुख)**
आठवले समाजकार्य महाविद्यालय भंडारा, (महाराष्ट्र )
9588696372,
ीमउंदजकमीउनी1890 ⁄ हउंपसण्बवउ

**प्रस्तावना :**

भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारतीय समाज आणि माणसाच्या मनात राजकीय आकांक्षा वाढल्या. प्रत्येक पंचवार्षिक योजना, निवडणूका, सत्तेचं विकेंद्रीकरण, लोककल्याणकारी योजना, षिक्षणाचा प्रसार यामुळे भारतीय जनमाणसात आमुलाग्र बदल झाला. लोकषाही शासन पध्दतीमुळे सर्वसामान्य माणसाला हक्क अधिकारांची भाषा कळू लागली. तळागाळात प्रचंड जागृती निर्माण झाली. स्वांतत्र्य प्राप्तीमुळे आपले सर्वच प्रष्न सुटतील अषी आषा पल्लवित झाली होती. पण काळाबरोबर अनेक समस्या वाढत गेल्या. बेकारी, दारिद्रय, वाढती लोकसंख्या, भ्रष्टाचार, जातीय दंगली, जातीयवादी राजकारण, पुनरूज्जीवनवादी शक्तीचं थैमान, दलितांवर वाढलेले अत्याचार आणि दुष्काळ यामुळे माणसांचा स्वातंत्र्य आणि लोकषाहीवरील विष्वास डगमळीत झाला. आपल्या प्रष्नांच्या सोडवणूकीसाठी लोकांच्या चळवळी संघटीत होऊ लागल्या.

शिक्षण आणि लोकषाहीचा विचार अनेक सामाजिक घटकांपर्यत पोहचला होता. निरनिराळया प्रदेषातील लोक, खेडी, खेडयाबाहेरील दलित, भटके, विमुक्त आणि आदिवासी षिक्षणामुळे जागे होऊ लागले. शेतकरी स्त्रिया आणि कामगार वर्गातही षिक्षणाचं भोग पसरलं. षिक्षणाचं लोकषाहीकरण सुरू झाले. ‘समता, स्वातंत्र्य, न्याय आणि स्वाभिमान’ हया मानवी मुल्यांची जाण झाल्यामुळे राष्ट्र, समाज आणि व्यक्तिच्या जीवनात क्रांतीकारक बदल घडून येऊ लागला. ‘विषम व्यवस्था आणि त्याविरूध्दचे असमाधान’ हयामुळे समाजमनात वेदना आणि विद्रोहाने पेट घेतला. हयाचेच वाङ्‌मयीन रूप म्हणजे ‘दलित साहित्य’ होय.

इंग्रजी आणि संस्कृतची प्रभूसत्ता संपल्यानंतर सामान्य माणूस त्यांची बोली, त्याचा परिसर आणि त्याचे प्रष्न हे साहित्याच्या केंद्रस्थानी येऊ लागले. अनेक समाज घटकातून नविन लेखळू उदयाला आले. हया लेखकांनी आपली भाषा, आपला प्रदेष, आपली परिस्थिती आणि आपले प्रष्न आपल्या साहित्यातून मांडले. मनोरंजनासाठी साहित्य वाचणाऱ्या वाचकाला हया नव्या साहित्याने हादरे दिले. शेतकरी, दलित, आदिवासी, भटके, विमुक्त आणि कामगार वर्गातून नवा लेखळू वर्ग उदयाला आला. त्याची भाषा, त्याचे अनुभवन व्यक्त करण्याची पध्दत ही रूढ वाङ्‌मयापेक्षा वेगळी होती. खिस्ती, मुस्लिम, धर्मातील लेखकांनीही आपल्या अनुभवांना शब्दांत वाट करून दिली. स्त्रियांही मोठया संख्येने लिहू लागल्या. आपल्या व्यथा, वेदना धीटपणे मांडू लागल्या. षिक्षणाचा प्रसार व प्रचार झाल्यामुळे नवा वाचक वर्ग वाढला. हा वाचक वर्ग

निरनिराळया सामाजिक स्तरातला होता. त्याची अभिरूची भिन्न स्वरूपाची होती. रूढ वाङ्:मयात त्याला त्याची प्रतिमा दिसत नव्हती. साहित्यातील अनुभव त्याला स्वतःचे वाटत नव्हते. हया सगळयांचा परिणाम तत्कालिन वाङ्:मय निर्मितीवर झाला.

कुठल्याही वाङ्:मय प्रवाहाची निकोप वाढ होण्यासाठी 'टिका प्रतिटिका' महत्त्वाची भूमिका बजावत असते. वेगळे अनुभव हे पारंपारिक चौकटीत बसत नाही. त्याची चर्चा व चिकित्सा करायची असेल तर ती वेगळीच झाली पाहिजे. त्यामुळे वाङ्:मयीन समीक्षेची वर्तुळे विस्तारणी गेली. नव्या प्रवाहामुळे मराठी भाषेत मोलाची भर पडली.

मराठी वाङ्:मयात निर्माण झालेले दलित साहित्य, ग्रामीण, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी, ख्रिस्ती, मुस्लिम साहित्य, जनसाहित्य या विविध प्रवाहामुळे मराठी वाङ्:मय सकस आणि समृध्द झाले आहे. नव्हे तर मराठीचा वाङ्:मयाचा अभूतपूर्व कायापालट झालेला आहे. हे साहित्य समृध्द आणि जीवनाच्या विविध स्तरांना स्पर्ष करणारे आहे. अनेक सामाजिक स्तरांमधून उदयाला आलेल्या लेखकांचे हे साहित्य आहे. आजवरच्या साहित्यात आमच्या विषयी लिहिले नाही. जे लिहिले ते विकत आणि चुकीचे होते म्हणून आम्हीच आमचे साहित्य लिहित आहोत. आमचं साहित्य हे आमच्या प्रष्नांचे साहित्य आहे. आम्ही जे जगलो, भोगलो त्याची ही अभिव्यक्ती आहे. त्यामुळे आमचे साहित्य आम्हीच लिहू शकतो अषी स्पष्ट भूमिका घेऊन हे लेखन केलेले आहे. हया साहित्याचा भाषा साहजिकच अधिक आहे. लोकषाही व्यवस्था आणि सार्वजनिक षिक्षण यामुळे मराठी वाङ्:मयाने कस बदललेली आहे. फुले, शाहू महाराज, आंबेडकर हयांचा विचारांचा प्रभाव हया साहित्यावर पडलेला आहे.

मराठी वाङ्:मयावर पडलेल्या इतर प्रवाहांचा प्रभाव आपण सविस्तर रूपाने पाहू.

**1) ग्रामीण साहित्य :**

कृषिनिष्ठ संस्कृती, निसर्गसन्मुखता, त्यातून निर्माण झालेले लोकमानस हे ग्रामीण जीवनाचे महत्त्वाचे घटक आहे. त्यातून जगण्याची एक रीत साकारत जाते. या रीतीचे चित्रण ज्या साहित्यात आढळते ते 'ग्रामीण साहित्य' होय.

ग्रामीण जीवनाचे प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष चित्रण साहित्यातून झाले असे साहित्य प्राचीन वाङ्:मयातीही पाहायला मिळते. 'दुष्टांतपाठा' मधून आले काही कथा शेती, शेतकरी आणि ग्रामीण जीवनाचे चित्रण करतात याचे उदाहरण म्हणजे 'आधारिथे परिसाचा दृष्टांत' घेता येईल. त्याचप्रमाणे नामदेव, तुकाराम, एकनाथ आदि संताच्या अभंगामधून ग्रामीण जीवनाच्या काही– छटा व्यक्त होतात.

आधुनिक कालखंडात हरीभाऊ आपटे यांची 'काळ तर मोठा कठीण आला' ही दुष्काळाच्या पार्ष्वभूमीवर लिहिलेली कथा ग्रामीण साहित्यात समाविष्ट होईल. ग्रामीण जीवनाची प्रखर जाणीव ही म. फुलांच्या वाङ्:मयात पाहावयास सापडते. 'गुलामगिरी' 'ष्षेतकऱ्यांचा आसूड' 'तृतीय रत्न' हे नाटक शेतकऱ्यांसबंधी मूलगामी विचार मांडणारे आहेत.

फुल्यांच्या अखंडामधून शेतकऱ्यांची पत्नी किंवा शेतीत रागणारी स्त्री अपरिमित कष्ट करते याचे त्यांनी रेखाटलेले चित्र परिणामकारक आहे. उदा.

'पाभरीचे मागे मोधीता तुरीसा मदत पतीस पेरीताना वाऱ्याचा सोसाट भर पाऊसात। करी ती मदत । पसीराय।

महात्मा फुल्यांनी जी जीवनदृष्टी दिली त्याचे परिणाम कृष्णराव भालेराव, महर्षि षिंदे, मुकुंदराव पाटील यांच्या साहित्यातून आढळून येतात.

जाणीवपूर्वक ग्रामीण जीवन दर्षन घडवणाऱ्या साहित्याचा सलग प्रवाह 1920 नंतर दिसतो. कारण फुले, आंबेडकरांच्या संपर्कामुळे जागृत झालेली तरूण पिढी वाचू–बोलू लागली. ही तरूण पिढी बहुजन समाजाच्या तळागळातून आलेली होती. या नवषिक्षितांना प्रकर्षाने जाणवले की अभ्यासाच्या निमित्त्याने आपण जे वाचले ते आपल्या जीवनानुभवांपेक्षा

वेगळे आहे. गैरसमज पसरविणारे आहे. मग मी, माझा समाज हा साहित्याचा विजय का होऊ नये? असा नविन विचार या पिढीला समावू लागला. ग्रामीण जीवनातील विषमता, अज्ञान, दारिद्रय, अनिष्ठ रूढी, परंपराभिमान इ. नष्ट करून त्यांची अस्मिता जागृत करण्याचे प्रयत्न मार्क्सवादी मंडळी, शाहू महाराज, भाऊराव पाटील यांनी केले. या स्थितंतराचा परिणाम साहित्यावर झाला. खेडे खेडयांचा परिसर निसर्ग जीवनातील समस्या यांचे दर्षन घडवणारा लेखकवर्ग निर्माण झाला.

1) 1925–1940 या काळात निर्माण झालेले सर्वकीकरण मंडळाचे ग्रामीण जीवे ग.ल. ठोकळ यांचा 'सुगी' ग.ह. पाटील यांचा 'रानजाई' हा काव्यसंग्रह 'मीठ–भाकर' हा कथासंग्रह इत्यादी साहित्य म्हणजे माहितीवाजा व तपषील पुरविणारे होते.

2) 1940–45 च्या काळात के. नारखेडे यांच्या 'षिवार' हा कवितासंग्रह प्रसिध्द झाला. परंतू त्यातील कविता हया सामान्य दर्जाच्या वाटतात. त्यानंतर श्री. म. माटे यांनी माणूसकीच्या नात्याने दिन–दलितांची सेवा केली आणि स्थानुभवातून 'माणूसकीचा गहिवर' उपेक्षितांचे अंतरंग यासारखे कथा लेखन केले.

3) 1946 च्या आसपास एकूण मराठी साहित्यात परिवर्तन झालेले आढळते. ग्रामीण माणसाचे मन, त्याचे वागणे यांचे चित्रण साहित्यात होऊ लागले. व्यंकटेष मागगुळकर, शंकर पाटील, द.मा. मिरासदार, रणजित देसाई, अण्णाभाऊ साठे इ. नी ग्रामीण कथा लिहिल्या. त्यांच्या कथेत ग्रामीण जीवनाषी जुळलेले अनेक पदर आढळतात.

4) 1960–70 च्या काळात करकरी ग्रामीण समाजातून आलेले आनंद यादव, शंकरराव खरात, बाबा पाटील, बाबुराव बाबुल सखा कुलाल, चंद्रकुमार नलमे इ. अनेक लेखक त्यांच्या कादंबऱ्यातून ग्रामीण वास्तव चित्रित करू लागले. 'करिरा' 'धन', 'टारफला', 'माणूस' या कादंबऱ्यातून ग्रामव्यवस्थेची एकूण रचना, ताण–तणाव, बदललेल्या अर्थव्यवस्थेमुळे विस्कटलेले ग्रामीण जीवन समर्थपणे प्रकट झालेले दिसते.

5) 1970 नंतरच्या कालखंडात ग्रामीण साहित्यात महाराष्ट्र चळवळीचे पडसाद उमटू लागले. स्वातंत्र्यानंतर झालेला भ्रमनिरास, बेकारी इ.मुळे नवी पिढी दिषाक्रिन अवस्थेत फिरत होती. याचे पडसाद 'उखडलेली झाले', 'झोंबी', 'हाल्या हाल्या दुदू दे', 'गांधरिचे डोळे', 'विषवृक्षाच्या मुळया', 'मरण कळा', 'अंत्रारमाती', इ. साहित्यातून ग्रामीण भागातील राजकारण, अपेक्षाभंगाचे दुःख, तरूण ग्रामीण मनाचा उद्रेक चित्रित झाला आहे. खेडयातील माणूस अखेर शोषिताचे जीवन जगतो अषा शोषितांचे चित्रण करणाऱ्या ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्मयात मोलाची भर घातली.

## 2) स्त्रीवादी साहित्य :

स्त्रीचे स्थान समाजात दुय्यम मानले जाते. तिच्याकडे एक व्यक्ती म्हणून पाहण्यापेक्षा 'बाई' म्हणून पाहिले जाते. स्त्री म्हणजे कोणाची तरी आई, बहीण, प्रेयसी किंवा पत्नी म्हणूनच तीची समाजात ओळख असते. सिमॉन द बोव्हा म्हणते, 'बाई म्हणून कोणी जन्माला येत नाही. नंतर तिला बाई बनवलं जातं.'

इथंच सामाजिक बंधनामधून स्वतःची सुटका करून स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व प्रस्थापित करण्याचे प्रयत्न स्त्रिया करीत आल्या आहेत. हयाचे पडसाद साहित्यातून उमटत आहेत. स्त्रियांनी पुरूषांचे लेखन नाकारून स्वतःच आपले अनुभव साहित्यातून मांडायला सुरूवात केली. पाष्चिमात्य देषातील स्त्रियांचा लढा आणि त्यांचे साहित्य हयापासून प्रेरणा घेऊन स्त्रिमुक्तीची चळवळ सुरू केली. आपले प्रष्न स्त्रियांनी आपल्या साहित्यातून मांडणे सुरू केले. स्त्रीवादी साहित्य हे स्त्री स्वातंत्र्यांचा पुरस्कार करते आणि पुरूषसत्ताक व्यवस्थेला नाकारते. स्त्रीला तिच्या हक्क–अधिकारांची जाणीव करून देते. आणि तिच्यावर लादलेल्या बंधनांना झुंगान देते.

## 3) दलित साहित्य :

आंबेडकरी विचारधारा आत्मसात केल्यामुळे प्राप्त होणाऱ्या जीवन विषयक दृष्टिकोनाद्वारे स्वतःला आणि स्वतः भोवतीच्या वास्तवाला जाणून घेण्याच्या उत्तर इच्छाषक्तीचा शब्दरूप अविष्कार म्हणजे दलित साहित्य होय.

डॉ. आंबेडकरांच्या चळवळीचा मराठी साहित्याच्या निर्मितीवर जोरकस परिणाम झाला. 1960 नंतर तेव्हापासून दलित साहित्य हा ठळक असा वाङ्मय प्रवाह मराठी साहित्यात वाटू लागला. त्यामुळे मराठी साहित्याच्या कक्षा रूंदावल्या गेल्या.

भारतीय राज्यघटनेची निर्मिती आणि प्रजासत्ताकाचा स्वीकार केल्यानंतर घटनेत अंतर्भूत असलेली समता जीवनातही अवथरेल अषी बहुजन वर्गाची अपेक्षा होती. परंतू शाळेतील अभ्यासक आणि सभोवतालचे टणक वास्तव यातील तफावत त्याला जावणू लागली. आंबेडकरी विचारांमुळे तरूणवर्ग संवेदनक्षम होऊ लागलो. भारतीय गुलामगिरीचा इतिहास वाचू लागला. थूद्र पूर्वी कोण होते? त्या ग्रंथाच्या वाचनाने त्यांच्या अस्मितेची साक्ष पटत होती. स्मृती ग्रंथातील गुलामगिरी भावना आणि मंदिर प्रवेषाच्या चळवळीत पुर्वजांनी सोसलेले हाल याचा इतिहास त्याच्या समोर होता. परंतू त्यांच्या परिवर्तनाच्या उत्सुकतेपुढे वास्तवाची जाणीव त्याला संतात करीत होती. हाच संताप तो शब्दांतून व्यक्त करू लागला.

'नागवाच जन्माला आलो आणि इथंही नागवला गेला' असे भेदक वास्तव तो शब्दांत मांडू लागला.

ज्यांनी चूक केली येथे जन्म घेण्याची,<br>
त्यांनीच ती सुधारली पाहिजे।<br>
देश सोडून अथवा भीषण युध्द करून ।।

अषा शब्दांत हा दलित संघर्ष सिध्द होऊ लागला. स्वातंत्रलढयाने दिलेला जीवनविषय दृष्टिकोन रूजवण्यासाठी राज्यघटनेने आष्वासन दिले. हयांचा लाभ ज्या बहुजन वर्गाला होणार त्या संवेदनक्षम प्रभाव वाङ्मय निर्मितीवर झाला.

**4) जनवादी साहित्य :**

जनवादी साहित्य धारा ही मार्क्सवादी दर्षनाच्या आधारे विकसित झालेली एक फरोगामी साहित्य धारा ही मार्क्सवादी विचारधारा आहे. विस्थपितांच्या जीवन जाणीवांची अभिव्यक्ती मार्क्सवादी दृष्टीतून सादर करणे व त्याद्वारे इष्ट समाज परिवर्तन घडवून आणणे हा तिचा हेतू आहे. मराठी साहित्यात तिसऱ्या दषकापासून मार्क्सवादी साहित्य म्हणून जी विचारधारा रूजू होत आहे, तिच्या प्रेरणा व तोंडवळा 'जनवादी' साहित्याषी थोडाफार मिळता–जुळता आहे. 'जे साहित्य शोषित–पिडीत वर्गाषी संबंधित असलेले प्रष्न वास्तवतेच्या पृष्ठीभूमीवर उभे करून शोषण आणि मुक्तीच्या मार्गाचे दिग्दर्षन करील व ते मार्ग अनुसरण्याची भूमिका पार पाडिल ते साहित्य जनवादी साहित्य होय.''

वरील भूमिकेनूसार वरेरकर, गोदावरी परूळेकर, विभावरी, षिरूरकर, अनंत कोणकर, अण्णाभाऊ साठे, शरदचंद्र मुक्तिबोध, लक्ष्मण माणे, यषवंत मनोहर, वि.स. जोग इत्यादी लेखक कवी हे 'जनवादी' साहित्य प्रवाहात समाविष्ट होतात. या प्रवाहातून तुरळक पण सकस असे साहित्य मराठी वाङ्मयाच्या दालनात दाखल होत आहे. त्या 'जनवादी' साहित्य प्रवाहामुळे काही विधायक स्वरूपाचे बदलही मराठी साहित्यात झालेले आढळतात. साहित्याचे स्वातंत्र्यापूर्वकालीन प्रारंभ रद्द होवून आकृतिनिष्ठ साहित्याऐवजी जिवंत उत्स्फुर्त आषननिष्ठ साहित्य पुढे येऊ लागले. उथळ रसिक रंजनी वृत्ती हळूहळू मावळत जाऊन जनअनुभव व जनमानस ते अभिव्यक्त करण्याची रिती तसेच या साऱ्यामागचे सामाजिक, नैतिक अधिष्ठातन यांच्या अनुरोधाने अस्सल साहित्याबीज विकसित करण्याचे नवे भाव 'जनवादी' प्रवाहाने मराठी साहित्यात आणले आहे.

**5) मुस्लिम साहित्य :**

मराठी प्रदेषात घेतलेल्या, मराठी प्रदेषात जन्म घेतलेल्या, मराठी असणाऱ्या धर्मान इस्लाम असणारा मराठी माणूस आणि मुसलमान म्हणून जगत असतांना जे ताण–तणाव निर्माण होतं आहेत ते व्यक्त करणारे साहित्य म्हणजे मुस्लिम साहित्य होय.

मुस्लिम मराठी साहित्याला 14 व्या शतकापासूनचा प्रदीर्घ इतिहास आहे. परंतू 1990 मध्ये सोलापूरमध्ये मुस्लिम मराठी साहित्य परिषदेची स्थापना करून पहिले अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य संमेलन घेण्यात आले आणि मुस्लिम मराठी साहित्याची सुरूवात झाली.

14 व्या शतकापासून महाराष्ट्रातला मुसलमान मराठीतून लिहित आलेला होता. मुस्लिम धर्मात अनेक संतकवी, रियासतकार भेदिक, काव्य करणारे, लावणीकार आणि शाहिर होऊन गेले. मुस्लिम मराठी साहित्याचा विकास पूढील पाच टप्पे पडतात.

1) 14–15 व्या शतकापासून उदयास आलेले मुस्लिम मराठी संतकवी साहित्य यामध्ये 42 मुस्लिम संताचा समावेष केला जातो. या काळातील प्रसिध्द संत म्हणजे शेख महमद.

2) संत साहित्यानंतर 18 व्या शतकापासून निर्माण झालेले शाहिरी आले. लावणी साहित्य, यामध्ये मुस्लिम मराठी शाहिरांच्या लावण्या, भेदिक लावण्या, पोवाडे, अभंग, कूटगीते, रियासती इ. वाङ्मय प्रकारांचा समावेष आहे.

3) तिसऱ्या टप्प्यात 1920 ते 1948–49 पर्यतच्या स्वातंत्र्य चळवळीच्या काळातील कवी–लेखकांचा समावेष होतो. या काळातील वाङ्मयावर स्वातंत्र्य लढयातील आंदोलनात भाग घेणाऱ्या क्रांतीकारकांचाही समावेष आहे. भारताच्या फाळणीमुळे होणाऱ्या दंगली आणि नागरिकांच्या कत्तली याचा एकूण परिणाम त्या काळातील साहित्यावर करता येईल.

4) चौथ्या टप्प्यात स्वातंत्र्योत्तर काळातील 1950 ते 1980 या काळातील साहित्य येते. 1970 नंतर महाराष्ट्रात उर्दू माध्यमातून सुरू झाली. डॉ. अजीज नदाफ, मुबारक शेख यांनी मुसलमानांच्या व्यथा सुखदूखे, समाजातील अडचणी व्यक्त करणारे साहित्य रचले आहे.

5) पाचव्या टप्प्यात 1985–86 पासून उदयास आलेले मुस्लिम मराठी साहित्य येते. हे साहित्य म्हणजे मुसलमानांच्या सामासंस्कृतिक इतिहासातील महत्वपूर्ण योगदान आहे. या काळातील मुस्लिम साहित्यीक ग्रामीण आणि तालुका परिसरातील आहेत. पाळणीमुळे भारत–पाकिस्तान युध्दामुळे वाढत गेलेले दुभंगलेपण, विरोधी लिखाण, नाकारल्या जाणाऱ्या संधी याची अस्वस्थता या पिढीतील फ.म. शहषिंदे, अजीज नदाफ, जावेद कुरेषी, मुबारक शेख, ऐहतेषोम देषमुख या लेखकांनी मोठया प्रमाणावर साहित्यातून मांडलेली आहे.

**6) ख्रिस्ती साहित्य :**

"मराठी साहित्यावर ख्रिस्ती साहित्याचे फार मोठे ऋण आहे. कारण आधुनिक मराठी साहित्याचा उदय आणि उगम ख्रिस्ती साहित्यातून झाला आहे. मराठी साहित्याच्या आज दिसणाऱ्या वटवृक्षाचे बीजारोपण महाराष्ट्रात आलेल्या ख्रिस्ती बांधवानी केलेले आहे." असे उद्गार कवी कुसुमाग्रजांनी 1988 साली काढले होते. मराठी भाषेतील ख्रिस्ती लेखकाचे पहिले पुस्तक 'मॅथ्यूचे शुभवर्तमान' हे कलकत्ता जवळील श्रीरामपूर येथे 1905 मध्ये प्रकाषित झाले आहे. त्यानंतर महाराष्ट्रातील पहिले मराठी मुद्रण 1817 मध्ये बार्डवेल या मिषनरीने केले आहे. मिषनरींनी ख्रिस्ती धर्माखेरीज मराठी संताच्या चरित्र तत्वज्ञानाविषयी ग्रंथ निर्मिती केलेली आहे. विल्यम कॅरे, मोलसवर्ध, जे. स्टीव्हन्सून, जॉन विळसने, मरे मिचेल, निकळ मॉक्निकल, जस्टीन ॲबट, जे.एफ. एडवर्डस् आदी धर्मज्ञ विद्वानांनी मराठी साहित्याची सेवा केलेली आहे. संत भारूदास, एकनाथ, तुकाराम आणि रामदास यांची चारित्रे आणि लेखन मिषनरींनी इंग्रजीत नेले आहे. इतकेच नव्हे तर 'ज्ञानेष्वर', 'तुकाराम बाबांचे धर्मविचार' आणि 'तुकाराम बाबांचा सोतू' असे मराठी ग्रंथही प्रकाषित केले आहेत.

ख्रिस्ती धर्माचा आषय विषय असलेले 'ख्रिस्त पुराण' हे दहा हजार श्लोकांचे महाकाव्य फादर टॉमस स्टीफन्स या पोर्तुगीज महाकवीने लिहिले आहे. हे पुस्कर 'ज्ञानेष्वरी इतके सरस आहे व उच्च दर्जाच आहे. फादर कुवा यांचे सेंट पीटरच पुराणा' तूनही हिंदु धर्माची बौध्दीक चिकित्सा केलेली आहे.

**ख्रिस्ती धर्मातरितांची साहित्य वैषिष्टये :**

गेल्या शतकांमध्ये सुरूवातीच्या दोन दषकात मराठी मुद्रणाची सुरूवात झाल्यानंतर मराठी शषिकांच्या धर्मांतराची एक प्रचंड छाट निर्माण झाली. हिंदु धर्मातील विविध स्तरांतील अनेकांनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. भागोबा पवार, कृष्णाली सांगळे, बाबा पद्मनजी, पंडिता रमाबाई, नीळकंठ शास्त्री गोरे, नारायण योषद्रि, गणपतराव नवलकर, न.वा. टिळक आदिंनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. तथापि केवळ धर्मांतर केले नाही तर, ख्रिस्ती साहित्याची व मराठी साहित्याची निर्मिती देखील केली. मराठी साहित्यातील पहिली कादंबरी 'यमुना पर्यटन' ही बाबा पद्मनजींनी लिहिली. 'अरूणोदय' ही मराठीतील पहिले आत्मकथनही त्यांचेच आहे.

**7) आदिवासी साहित्य :**

आदिवासी साहित्य हा भारतातील मूळ निवासी असून आर्यांच्या आक्रमणांमुळे डोंगर–दऱ्या, नदी–नाले, जंगले यांचा आश्रय घ्यावा लागला. महाराष्ट्रात गोंडवून सहयांद्री व सातपूडा या पर्वतरांगाच्या परिसरात आदिवासींच्या वस्त्या आहेत.

आदिवासी समाज हा शहरी व ग्रामीण समुदायापासून अंतरलेला आहे. गावाबाहेरच्याही समाजापेक्षा या जमातींची अवस्था फार बिकट आहे. आदिवासी समाजाची जमीनदार, व्यापारी, श्रीमंत शेतकऱ्यांकडून त्यांचे शोषण व पिळवणूक केली. लाचार व भटकंतीचे उपेक्षीत जीवन आदिवासींच्या वाटयाला आले. आदिवासी समाज निर्धन, निरक्षर असला तरी त्याची स्वतंत्र आणि अर्थपूर्ण संस्कृती आहे. रूढी व परंपरा, सण–समारंभ व साहित्य कला आहेत. त्यांच्या लक्षवेधक समाज जीवनामुळे ब्रिटीषांच्या काळात काही जागृतीचे कार्य सुरू झाले.

आदिवासी समाजात षिक्षण, चळवळ व जागृतीचे प्रमाण अधिक वाढल्याने माणूस लिहू, वाचू, बोलू लागला. त्याच्या साहित्यिक जाणिवा व्यापक बनल्या असून मराठी साहित्याचे व चळवळीचे भान त्याला आले. त्याने स्वतःचे साहित्य निर्माण करण्यासाठी 1979 पासून आदिवासी साहित्य संमेलने भरविली गेली. तेव्हापासून लिखित स्वरूपाचे मराठी साहित्य निर्माण झाले. 'भोहोळ', 'वनवासी', 'वर्णसूर्य', इ. कविता संग्रह, 'आदोर', 'तृष्णा', 'झेलझपाट', यासारख्या कादंबऱ्या निर्माण झाल्यात. आदिवासी कथा वाङ्‌मयाची निर्मिती ही त्यांच्या जीवनातील घटना, प्रसंग, प्रवृत्ती यांच्या अनुषंगाने झाल्या तो एक आदर्ष नवोदित कथाकारापूढे आहे.

**संदर्भसूचीः**

1 वरखेडे मंगला : स्त्रियांची नवकथा – वाटा आणि वळणे
2 साने गीता : भारतीय स्त्रीजीवन
3 फळके भालचंद्र : दलित साहित्याची प्रकाषयात्रा
4 कुलकर्णी गो.म. : साहित्य दलित आणि ललित
5 कोत्तापल्ले नागनाथ : ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध
6 यादव आनंद : ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या

———